# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

## मराठी विभाग सन २०२४ -२५ बी.ए.भाग- ३ सत्र ५

## अभ्यसपत्रिका क्रमांक १० मराठी भाषा आणि अर्थार्जनाच्या संधी- प्रश्न पेढी

VCCK - मराठी विभाग- प्रा. आंबेकरी व्ही. आय.

**प्रश्न-१ योग्य पर्याय निवडा.**

१. बौद्धिक मेहनत, सभोवतालचे सूक्ष्म निरीक्षण, संवेदनशीलता व विशिष्ट भाषिक अवकाशांचा वापर या गोष्टी कोणत्या लेखनासाठी आवश्यक आहेत.

अ) ऐतिहासिक
ब) वैज्ञानिक
**क) सर्जनशील**
ड) यापैकी नाही

२. जिवंतपणा आणि कार्यकारणभाव यामुळे गोष्टीची काय निर्माण होते.

**अ) कथा**
ब) कादंबरी
क) नाटक
ड) कविता

३. कथेचा रचनाबंध अथवा रूपबंध समजून घेणे म्हणजे कथेची समजून घेणे होय.

अ) पात्ररचना
**ब) संकल्पना**
क) अभिव्यक्ती
ड) भाषिक रचना

४. कोणता घटक हा कथेच्या संकल्पनेचा गाभा असतो.

अ) पात्ररचना
ब) संवाद
क) संघर्ष
**ड) कथानक**

५. कथा अधिकाधिक परिणामकारक होण्यासाठी तिचा मूळ स्वभाव कोणता ?

**अ) संक्षेप**
ब) विस्तार
क) विस्कळितपणा
ड) असंघटितपणा

६. कथानक ज्या पार्श्वभूमीवर घडते ती पार्श्वभूमी उठावदार होण्यासाठी कथेथ काय महत्त्वाचे असते.

**अ) वातावरणनिर्मिती**
ब) संवादरचना
क) संघर्ष
ड) पात्रे

७. कथानिर्मिती प्रक्रियेत भाषा हे कथेचे काय असते.

अ) बाह्यरूप    **क) मूलद्रव्य**
ब) अंतरंग    ड) यापैकी नाही

८. कोणता घटक हा वैचारिक वाङ्मयाचा प्राण आहे.

**अ) विचार**

ब) रंजन

क) काल्पनिकता

ड) अद्भूतता

९ . तर्कशुद्ध साधार प्रतिपादन करीत एका निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे लेखन कोणते ?

अ) कादंबरी

ब) कथा

क) कविता

**ड) वैचारिक**

१०. विषयाचे समग्र आकलन, शास्त्रीय अन्वेषक दृष्टी, बहुश्रुतता, तर्कशुद्ध युक्तिवादकौशल्य यामुळे वैचारिक साहित्यास काय प्राप्त होते.

अ) रंजनपरता

**ब) वस्तुनिष्ठता**

क) कलात्मकता

ड) रूक्षता

११. विषयाची उकल, तार्किकता आणि आवाहकता ही कोणत्या साहित्याची वैशिष्ट्ये आहेत.

**अ) वैचारिक**

ब) वैज्ञानिक

क) ललित

क) बालसाहित्य

१२. खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य वैचारिक साहित्याच्या बाबतीत महत्त्वाचे आहे.

**अ) अलंकारविरहितता**

ब) काल्पनिकता

क) तत्त्वज्ञानप्रणित

ड) पौराणिकता

१३. संशोधनाच्या प्रक्रियेला प्रारंभ कोठून होतो.

**अ) विषय निवड**

ब) संशोधन पद्धती निवड

क) संशोधनाची भाषा

ड) यापैकी नाही

१४. "संशोधन म्हणजे शोध घेणे, चौकशी करणे, काळजीपूर्वक तपास करून सत्यशोधण्याचा शास्त्रीय प्रयत्न करणे" ही व्याख्या कोणाची.

अ) दु. का. संत

**ब) उषा देशमुख**

क) सु. आ. चुणेकर

ड) वसंत जोशी

१५. शोधनिबंधाच्या सर्वात शेवटी आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ काय जोडावी लागते.

अ) परिशिष्टे

ब) निष्कर्षसूची

**क) संदर्भग्रंथसूची**

ड) नकाशे/आकृत्या

VCCK - मराठी विभाग - प्रा. आंबवणी व्ही. आय.

१६. कोणत्या लेखनामुळे विद्यार्थ्यांमधील निरीक्षण, संकलन, चिकित्सा, निवेदन, सादरीकरण, संवादकौशल्य आणि भाषिक कौशल्य या क्षमतांचा विकास होतो.

अ) प्रबंधिकालेखन

ब) प्रबंधलेखन

क) शोधनिबंधलेखन

**ड) प्रकल्पलेखन**

१७. संशोधनातील कोणत्या सर्वोच्च पदवीसाठी प्रबंधलेखन केले जाते.

अ) एम. फिल.

**ब) पीएच.डी.**

क) डी.लिट.

ड) यापैकी नाही

१८. आंतरजाल हा कशाचा महासागर आहे.

**अ) ज्ञानाचा**

ब) पाण्याचा

क) अज्ञानाचा

ड) शून्य तंत्रज्ञान

१९. शासकीय प्रशासन व्यवहारात मराठी भाषेत टंकलेखन करण्यासाठी कोणता टंकलेखन कोड अनिवार्य मानला आहे.

अ) कृतिदेव

ब) देवनागरी

**क) योगेश**

ड) युनिकोड

२०. खालीलपैकी कोणत्या प्रकारामध्ये नोंदीलेखन करताना नोंदीचे स्वरूप हे लघु, मध्यम आणि दीर्घ असे निश्चित केले आहे.

अ) विकिपीडिया

**ब) विश्वकोश**

क) योगेश

ड) युनिकोड

२१. आंतरजालावरील विकिपीडिया हा कोणता ज्ञानकोश म्हणून ओळखला जातो.

**अ) मुक्त**

ब) बंदिस्त

क) रचनाबद्ध

ड) यापैकी नाही.

२२. भाषा संचालनालयामार्फत सर्व पदनामांचे मराठी नामकरण असणारा कोश म्हणून कोणता ग्रंथ प्रकाशित केला आहे.

अ) वस्तुनिष्ठ मराठी　　**क) प्रशासनिक लेखन**

ब) प्रशासनातील मराठी　　ड) प्रशासन

२३.'मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास' हे बोधवाक्य त्या संस्थेचे आहे?

**अ) राज्य मराठी विकास संस्था**

बं) भाषा संचालनालय

क)  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ

ड) मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन

VCCK - मराठी विभाग - प्रा. आंबवणे व्ही. आय.

२४ .11 नोव्हेंबर 1960 रोजी कोणत्या मंडळाची स्थापना झाली?

अ) राज्य मराठी विकास संस्था

ब) भाषा संचालनालय

**क) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ**

ड) मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन

२५.भाषा संचालनालययाची स्थापना केव्हा झाली?

अ) एक मे 1960

**ब) 6 जुलै 1960**

क) एक मे 1992

ड) एक मे 2000

२६.मराठी भाषा पंधरावडा केव्हा साजरा केला जातो

**अ) 1 जानेवारी ते 15 जानेवारी**

ब) 1 फेब्रुवारी ते 27 फेब्रुवारी

क) 1 जुलै ते 15 जुलै

ड) 1 नोव्हेंबर ते 15 नोव्हेंबर

२७. 2001 सालापासून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास शासनामार्फत किती रुपये अनुदान दिले जाते?

अ) एक कोटी

ब) 50 लाख

क) 75 लाख

**ड) 25 लाख**

२८.29 नोव्हेंबर 2010 रोजी च्या शासन निर्णयान्वये कोणता विभाग स्थापन झाल्याचे जाहीर करण्यात आले?

अ) राज्य मराठी विकास संस्था

ब) भाषा संचालनालय

क) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ

**ड) मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन**

२९.कोणत्या संस्थेची स्थापना स्वातंत्र्यपूर्वकाळात 110 वर्षांपूर्वी झाली?

अ) राज्य मराठी विकास संस्था

**ब) मराठी साहित्य परिषद, पुणे**

क) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ

ड) मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन

३०.साहित्यिक साह्यनिधी म्हणून अपंग, वृद्ध, निराधार साहित्यिकांना दरमहा मानधन देण्याचे काम कोणती संस्था करते?

अ) राज्य मराठी विकास संस्था

ब) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ

क) मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन

**ड) मराठी साहित्य परिषद, पुणे.**

३१.महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश या संस्थेची स्थापना केव्हा झाली?

अ)1 डिसेंबर 1960

ब) 1 डिसेंबर 1961

**क) 1 डिसेंबर 1980**

ड) 1 डिसेंबर 1981

VCK- मराठी विभाग. प्रा. आंबेकर व्ही. आय.

३२.भारतीय पातळीवर साहित्य सेवा करणारी महत्त्वाची संस्था म्हणून कोणती संस्था काम करते?

अ) अखिल भारतीय परिषद

**ब) साहित्य अकादमी**

क) नॅशनल अकॅडमी

ड)यापैकी नाही

३३.खालीलपैकी कोणत्या संस्थेची स्थापना 1954 साली झाली?

अ) अखिल भारतीय परिषद

ब) साहित्य अकादमी

**क) नॅशनल अकॅडमी**

ड) यापैकी नाही

३४.भारतीय भाषांमध्ये चांगल्या पुस्तकाची निर्मिती व्हावी या हेतूने कोणत्या संस्थेची स्थापना 1957 मध्ये करण्यात आली?

अ) अखिल भारतीय परिषद

ब) साहित्य अकादमी

**क) नॅशनल बुक ट्रस्ट**

ड) यापैकी नाही

३५.भारत सरकारच्या मानव संसाधन आणि विकास मंत्रालयाच्या वतीने 1969 साली म्हैसूर येथे कोणत्या संस्थेची स्थापना करण्यात आली.

अ) अखिल भारतीय परिषद

ब) साहित्य अकादमी

क) नॅशनल बुक ट्रस्ट

**ड)भारतीय भाषा संस्था**

३६. राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना केव्हा झाली?

अ) १ मे 1960

ब) २६ जानेवारी 1950

**क) १ मे 1992**

ड) १ मे 2000

३७. कोणत्या संस्थांनी भारतीय भाषांना संगणकानुकूल बनवण्यासाठी मोठे कष्ट घेतले?

**अ.सि-डॅक**

ब.युनिकोड

क.मायक्रोसॉफ्ट

ड.इंटेल

३८.कोणते सर्च इंजिन आजचे सर्वाधिक लोकप्रिय आहे?

**अ. गूगल (Google)**

क. बिंग (Bing)

ब. याहू (Yahoo!)

ड. डकडकगो (DuckDuckGo)

३९. विश्वकोश मंडळाची स्थापना किती साली झाली ?

**अ.१९६०**

ब.१९७०

क.१९६८

ड.१९९९

VCCK- मराठी विभाग- प्रा. आंबवणे व्ही. आय.

४०. जिमी वेल्स आणि लॅरी सँगर यांनी कोणत्या साली विकिपीडियाची सुरवात केली.

अ.15 ऑगस्ट 1947

ब. 15 जानेवारी 1995

क.15 जानेवारी 1999

**ड. 15 जानेवारी 2001**

४१.एम. फील., पदवीसाठी लिहलेल्या शोध प्रकल्पाला काय म्हणतात?

अ.शोधनिबंध

ब.प्रबंध

**क.प्रबंधिका**

ड.सारलेखन

४३. संशोधन पर लेखनाची भाषा कशी असते?

अ.सौम्य

ब.लवचिक

क.मनोरंजनपर

**ड.प्रौढ प्रगल्भ**

४४.वाचकाच्या बुद्धीला सतत आवाहन करणारे आणि तर्कशुद्ध, सप्रमाण, संदर्भसह विषय मांडणारे विचार प्रधान लेखन म्हणजे कोणते साहित्य होय?

**अ. वैचारिक**

ब. वैज्ञानिक

क. ललित

ड. बाल

४५. कोणत्या लेखनात विचार प्रकटीकरण केंद्र वरती असते?

**अ. वैचारिक**

ब. वैज्ञानिक

क. ललित

ड. बाल

४६.वैचारिक लेखक आपल्या लेखणीतून कोणत्या ना कोणत्या समाज गटांना जनसमुहांना काय?

अ.दिग्दर्शन

ब.मार्गदर्शन

**क.आवाहन**

ड.मनोरंजन

४७.........हा वृत्तपत्राचा चेहरा असतो?

अ.बातमी

**क.अग्रलेख**

ब.विचार

ड.वृत्त

४८.वृत्तपत्रामध्ये संपादकाने स्वतः साठी खास जागा राखून ठेवलेले असते त्या जागेतून जाणाऱ्या लेखास काय म्हणतात

**अ. संपादकीय लेख**

ब.स्तं भलेखन

क. स्फुटलेखन

ड. यापैकी नाही

VCCK- मराठी विभाग- प्रा. आंबेकर व्ही. आय.

४९.विशिष्ट विषयावरील समकालीन संदर्भात देत लिहिलेला वर्तमानपत्रातील लेख म्हणजे लेखन होय?

अ )संपादकीय लेख

ब ) स्तंभलेखन

**क )स्फुटलेखन**

ड )यापैकी नाही.

५०.गोष्टी मध्ये केवळ काय असतात?

अ) विचार

ब ) अनुभव

**क ) घटना**

ड ) तर्क

५२.वास्तवातल्या घटनांना आधाराला घेऊन त्याचे काल्पनिकीकरण करून ते सांगितले जाते त्यास काय म्हणतात?

अ ) गोष्ट

**ब ) कथानक**

क ) स्फुट लेखन

ड ) वरील पैकी सर्व

५३.प्रतिभा नावाची गोष्ट कथेत एक टक्का असते तर परिश्रम किती टक्के असते

**अ ) नव्याण्णव**

ब ) पन्नास

क ) सत्तर

ड ) एक

५४.कथेतील पात्रांना काय म्हटले जाते?

अ ) इसम

**ब ) व्यक्तिरेखा**

क ) लोक

ड ) वरील पैकीनाही

५५.कथेमध्ये कथा सांगणारा जो असतो त्याला काय म्हणतात?

**अ) निवेदक**

ब )अभिनेता

क )दिग्दर्शक

ड )नियंत्रक

VCCK-मराठी विभाग- प्रा. आंबेकर व्ही. आय.

**प्रश्न-२ दीर्घोत्तरी प्रश्न**

१. कथा निर्मितीप्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा.
२. कथेचे घटक कोणते? याची सविस्तर चर्चा करा.
३. मराठी कथेच्या उद्‌गम व विकासाची साधक बाधक चर्चा करा.
४. वैचारिक लेखनाच्या पद्धतीचे सविस्तर विवेचन करा.
५. वैचारिक साहित्याची संकल्पना स्पष्ट करून वैचारिक साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.
६. संशोधनाच्या वेगवेगळया व्याख्यांधारे संशोधन संकल्पना स्पष्ट करा.
७. संशोधनाचे वेगवेगळे लेखन प्रकार सविस्तर सांगा.
८. आंतरजालावरील मराठीविषयक लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.
९. विकिपीडिया या संकेतस्थळावर मराठी भाषेतून नोंदी लेखन करावयाचे वेगवेगळे प्रकार स्पष्ट करा.

**प्रश्न ३ लघुत्तरी प्रश्न**

१. गोष्ट आणि कथा यातील फरक सांगा.
२. कथानिर्मितीत कथानकाचे स्थान सांगा.
३. वैचारिक लेखन म्हणजे काय?
४. वैचारिक लेखनाच्या प्रेरणा सांगा.
५. वैचारिक लेखनाची सुरुवात कशी करावी.
६. संशोधनाच्या लेखनपद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.
७. संशोधनासाठी आवश्यक गुण कौशल्ये कोणती.
८. संशोधनाच्या स्वरूपाविषयी थोडक्यात चर्चा करा.
९. आंतरजालावरील मराठी विश्वकोशातील नोंदीलेखनाचे स्वरूप थोडक्यात सांगा.
१०. राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट करा.
११. भाषा संचालनालयाच्या कार्यपद्धतीचा थोडक्यात आढावा घ्या.

**प्रश्न ४ टिपा लिहा.**

१. सर्जनशील लेखन
२. कथा म्हणजे काय?
३. कथारचनेत भाषेचे स्थान
४. वैचारिक लेखनात वस्तुनिष्ठतेचे महत्त्व
५. अग्रलेख
६. स्तभंलेखन
७. स्फुटलेखन
८. संशोधनातील पथ्ये
९. संशोधनपर लेखनाची भाषा
१०. प्रबंधलेखन पद्धती.
११. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन
१२. मराठी साहित्य परिषद, पुणे
१३. विश्वकोश मंडळ
१४. साहित्य अकादमी
१५. भाषा संस्थान, म्हैसूर

VCCK - मराठी विभाग-प्रा. आंबेकरी व्ही. आय.